(सोबत वित्त विभाग यांचे "सेवानिवृत्त होणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतनाविषयक लाभ वेळेवर अदा व्हावेत यासाठी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम ११८ ते १२५ च्या तरतुदींचे काटेकोरपणे पालन करणेबाबत" या विषयाचे शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण२०१९/३९/प्र.क्र.१७/सेवा-७, दिनांक ९/९/२०१९ ची प्रत सोबत जोडत आहे)

---

क्रमांक : १६/संकीर्ण/२०१९/शा२४५२
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३ महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७,
मुंबई ४०० ००१.

दिनांक : 9/9/2019

प्रति,

१) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.

२) सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.
त्यांनी त्यांचे अधिपत्याखालील सर्व संस्था / कार्यालये प्रमुखांच्या निदर्शनास आणावे.

सहसंचालक तंत्रशिक्षण,
वि
क्र 70444
दि 23 SEP 2019

(प्रमोद नाईक)
सहसंचालक,
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

23/9/19 23/9/019

जा.क्र.विकाओ/आस्था-३/२०१९/ 3005
दिनांक :- 26 SEP 2019

प्रति,
प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय / शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, औरंगाबाद
उपसचिव, तंत्रशिक्षण मंडळ प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद
प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन,औरंगाबाद, जालना,अंबड,जिंतूर,हिंगोली,नांदेड,उस्मानाबाद, बीड
पु.ला.शा.तं.लातूर,.म.तं.नि.लातूर

यांना कळविण्यात येते की, सोबत वित्त विभाग यांचे "सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतनविषयक लाभ वेळेवर अदा व्हावेत यासाठी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम ११८ ते १२५ च्या तरतुदीचे कोटेकारेपणे पालन करणेबाबत" या विषयाचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१९/३९/प्र.क्र.१७/सेवा-७, दि.०९.०९.२०१९ ची प्रत सोबत जोडली आहे. सोबत जोडलेल्या परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन केले जाईल. याबाबत आवश्यक दक्षता घ्यावी, निवृत्तीवेतनाची प्रकरणे निकालात काढण्यास अक्षम्य दिरंगाई झाल्यास व्याजापोटी अशी प्रकरणे प्रलंबित राहिल्यास या संबंधित सर्वोतपरी जबाबदारी कार्यालय प्रमुखांची राहील याची याची नोंद घ्यावी.

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

प्रतः या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना माहितीस्तव, या कार्यालयाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी

सेवानिवृत्त होणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतनविषयक लाभ वेळेवर अदा व्हावेत यासाठी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम,१९८२ मधील नियम ११८ ते १२५ च्या तरतुदींचे काटेकोरपणे पालन करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

## वित्त विभाग

शासन परिपत्रक,क्रमांक-संकीर्ण २०१९/३९/प्र.क्र.१७/सेवा-७
हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा मार्ग
मंत्रालय,मुंबई ४०००३२.
दिनांक: ९ सप्टेंबर,२०१९

वाचा:- १) शासन परिपत्रक,वित्त विभाग,क्रमांक-सेनिवे १००६/८१/सेवा ४,दिनांक २०.११.२००६
२) शासन परिपत्रक,वित्त विभाग,क्रमांक-सेनिवे १००८/५०/सेवा ४,दिनांक १७.०६.२००८
३) शासन निर्णय,वित्त विभाग,क्रमांक -सेनिवे २०१४/प्र.क्र.३६/सेवा-४,दि.०२/०७/२०१५
४) शासन निर्णय,वित्त विभाग,क्रमांक -संकीर्ण २०१५/प्र.क्र.८३/कोषा.प्रशा.५दि.३०/१२/२०१५
५) शासन परिपत्रक,वित्त विभाग,क्रमांक-सेनिवे २०१६/प्र.क्र.३७/सेवा ४,दिनांक २९/०४/२०१६
६) महालेखापाल(लेखा व हकदारी)-२महाराष्ट्र,नागपूर क्र.PM/RetdCases/DEC-२०१८/३२१ दि.२४.०१.२०१९ चे पत्र

## परिपत्रक

१. सेवानिवृत्त होणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतनविषयक लाभ वेळेवर प्रदान करण्यासंबंधात शासनाने यापूर्वी उपरोल्लिखित परिपत्रकांव्दारे वेळोवेळी सूचना दिलेल्या आहेत. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२च्या प्रकरण १० मधील म्हणजेच नियम ११८ ते १२५ मधील तरतूदींचे पालन काटेकोरपणे करण्याच्या सक्त सूचना शासनाने देऊनही बऱ्याचशा विभाग/कार्यालय प्रमुखांकडून या सूचनांचे अद्यापही पालन केले जात नाही ही बाब महालेखापाल, नागपूर यांनी उपरोक्त संदर्भादिन क्र.४च्या पत्रान्वये शासनाच्या निदर्शनास आणली आहे.

२. शासनाने या बाबींची गंभीर दखल घेतली आहे. विभाग/कार्यालय प्रमुखांकडून निवृत्तीवेतन व उपदान प्रत्यक्ष देण्याच्या व प्राधिकृत करण्याच्या विहीत कार्यपध्दतीचे पालन करण्यात न आल्याच्या परिणामी बऱ्याच प्रकरणी सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतनविषयक लाभ विलंबाने प्रदान केले जातात. परिणामी निवृत्तीवेतनधारकांना आर्थिक त्रास सहन करावा लागतो.शिवाय विलंबाने प्रदान केलेल्या निवृत्तीवेतन विषयक रकमांवर व्याज प्रदान करावे लागत असल्यामुळे त्याचा आर्थिक भार शासनाच्या तिजोरीवर पडतो.निवृत्तीवेतनविषयक लाभांचे प्रदान विलंबाने केले गेल्यामुळे मा.उच्च न्यायालयाने काही प्रकरणांत नाराजी व्यक्त केली आहे,ही बाब देखिल गंभीर आहे.

३. उपरोक्त बाबीस अनुसरुन सर्व प्रशासकीय विभाग,विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांना खालीलप्रमाणे पुनश्च सूचना देण्यात येत आहेत:-

- महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम,१९८२,नियम ११८ च्या तरतूदीनुसार प्रत्येक विभाग/कार्यालय प्रमुखाने दर सहा महिन्यांनी म्हणजेच दरवर्षी १ जानेवारी व १ जुलै रोजी,त्या तारखेपासून पुढील २४ ते ३० महिन्यांमध्ये सेवानिवृत्त होणाऱ्या सर्व शासकीय कर्मचाऱ्यांची यादी तयार करुन ती संबधित महालेखापाल कार्यालयाकडे ३१ जानेवारी किंवा ३१ जुलै पर्यंत पोहचेल अशा बेताने पाठविणे आवश्यक आहे.शिवाय नियत वयमानाव्यतिरिक्त इतर कारणास्तव सेवानिवृत्त होणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांच्याबाबतीत अशा सेवानिवृत्तीबद्दल माहिती प्राप्त होताच ती संबधित महालेखापालांना यथाशिघ्र पाठविण्यात यावी.

सर्वसाधारण सभालेखक
महाराष्ट्र राज्य, मुंबई
नोंद ........
दिनांक ........
कार्यविवरण क्र ........

क्र-१६
३/९

- महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम,१९८२ नियम १२०च्या तरतूदींनुसार निवृत्तीवेतन विषयक कागदपत्रे तयार करण्याच्या कार्यवाहीस सेवानिवृत्तीच्या तारखेच्या दोन वर्षे अगोदर सुरुवात करणे,निवृत्तीवेतनविषयक कागदपत्रे पूर्ण करताना उपरोक्त नियमावलीच्या नियम १२१ च्या तरतूदीनुसार सेवेची पडताळणी करणे, सेवापुस्तकातील उणीवा भरुन काढणे, सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून आवश्यक ती माहिती विहीत नमुन्यात भरुन घेणे इत्यादीबाबतची पूर्तता करुन,कार्यालय प्रमुखाने परिपूर्ण कागदपत्रे उपरोक्त नियमावलीच्या नियम १२२ व १२३ च्या तरतूदीनुसार शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीच्या तारखेपूर्वी सहा महिन्यांच्या आत संबधित महालेखापालांकडे ऑनलाईन पाठविणे आवश्यक आहे.
- निवृत्तीवेतन विषयक कागदपत्रे वरील तरतूदीनुसार विहीत कालावधीत महालेखापालांकडे सादर केली जात नाहीत अथवा ती अपूर्ण असतात.काही प्रकरणे त्रुटी असल्यामुळे महालेखापाल यांच्या कार्यालयाकडून आक्षेप घेऊन ती संबधित विभाग/कार्यालय यांना परत पाठविण्यात येतात.अशा महालेखापाल कार्यालयाकडून उपस्थित झालेल्या आक्षेपांची पूर्तता संबधित कार्यालय प्रमुखाने १५ दिवसात होईल याची दक्षता घ्यावी.
- वित्त विभागाच्या संदर्भ क्रमांक ३ येथील दिनांक०२,जुलै,२०१५ च्या शासन निर्णयानुसार कार्यालय प्रमुखाने सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांची निवृत्तीवेतन प्रकरणे महालेखापाल कार्यालयास ऑनलाईन पद्धतीने सादर करणे अनिवार्य आहे.
- वित्त विभागाच्या संदर्भ क्रमांक ४ येथील दि.३०,डिसेंबर,२०१५ च्या शासन निर्णयानुसार कार्यालय प्रमुखाने,महालेखापाल कार्यालयाकडून निवृत्तीवेतन प्रदान आदेश प्राप्त झाल्यानंतर निवृत्तीवेतनधारकांचे ओळख पडताळणीसाठी आवश्यक असणारे फॉर्म नमुना 'अ' व नमुना 'ब' व नमुना -४२-अ' ऑनलाईन पद्धतीने अपलोड करण्यात यावे. तसेच मूळ कागदपत्रे कोषागार कार्यालयास विहीत वेळेत पाठविणे आवश्यक आहे.
- शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीच्या तारखेच्या सहा महिने अगोदर संबंधित महालेखापालांच्या कार्यालयाकडे पाठविले जातील याबाबतीत सर्वतोपरी दक्षता घ्यावी.

४. शासनाच्या वरील आदेशांचे काटेकोरपणे पालन न केल्यामुळे विलंब झाल्याचे निदर्शनास आले तर विलंबास जबाबदार असणारे संबधित अधिकारी/विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांचेविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येइल.तसेच "निवृत्तीवेतनाची प्रकरणे निकालात काढण्यास अक्षम्य दिरंगाई झाल्याने व्याजापोटी शासनास आर्थिक झळ बसण्यास जबाबदार आहेत." अशा प्रकारची नोंद संबधीतांच्या गोपनीय अहवालात घेण्यात यावी.

५. सर्व विभाग/कार्यालय प्रमुखांनी उपरोल्लिखित परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन केले जाईल, याबाबत आवश्यक दक्षता घ्यावी.अशी प्रकरणे प्रलंबित राहिल्यास या संबंधातील सर्वोतपरी जबाबदारी विभाग/कार्यालय प्रमुखाची राहील असे पुनश्च त्यांच्या निर्दशनास आणून देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९०९१२२६४८०००५ हा आहे.हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(इंद्रजीत गोरे)
शासनाचे उपसचिव

प्रति,

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.

२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.

३) महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.

४१) सर्व विभागीय शिक्षण उप संचालक.
४२) सर्व विभागीय तंत्र शिक्षण उप संचालक.
४३) कुल सचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठे, राहुरी, जिल्हा अहमदनगर.
४४) कुल सचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.
४५) कुल सचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला.
४६) कुल सचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी.
४७) कुल सचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेर, जिल्हा रायगड.
४८) कुल सचिव, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.
४९) बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई - ४०० ००१.
५०) भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरॅक नं.१, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरीमन पॉईट, मुंबई - ४०० ०२०.
५१) भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई - ४०००04.
५२) भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई - ४०० ०१३.
५३) इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०२५.
५४) नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.
५५) शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई - ४०० ०२८.
५६) ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
५७) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
५८) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
५९) कृषि व पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई.
६०) वित्त विभागातील सर्व कार्यासने.
६१) निवड नस्ती.
* पत्राद्वारे.